# ऋणनिर्देश


शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी माझ्या "चारुता सागर यांच्या कथासंग्रहामधील स्त्री जीवन : एक चिकित्सक अभ्यास" हा लघुप्रबंध तयार करीत असताना माझ्या अभ्यासाला दिशा देण्याच्या कामी ज्या व्यक्तींचे सहकार्य मिळाले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

माझे मार्गदर्शक गुरूवर्य प्राचार्य डॉ.हरिश्चंद्र निर्मळे यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना व मार्गदर्शन यामुळेच हा लघुप्रबंध मी वेळेत पूर्ण करू शकलो. त्यांचे आभार मानणे शब्दांच्याही पलिकडचे. त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटेल.

प्रा.डॉ.विष्णू वासमकर यांनीही वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व सूचना यामुळे माझ्या कामाला आकार आला, म्हणून त्यांच्याही ऋणात राहण्यात मला आनंद वाटेल.

प्रसिद्ध ग्रामीण कथालेखक चारुता सागर यांना वेळोवेळी भेटण्यास गेल्यानंतर माझ्याशी संवाद साधला, कथेवर मनमोकळेपणाने बोलले. पाठीवरती हात ठेवला यातूनच प्रेरणा मिळत गेली आणि माझ्या हातून हे काम पूर्णत्वास जात आहे. त्यांचे मी आभार मानतो.

प्रा.डॉ.उल्हास माळकर, प्रा.लक्ष्मण शिंदे, प्रा.मोहन लोंढे, प्रा.एन.पी.सावंत, वैशाली शिणगारे, दत्ता शिंदे यांनी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

त्याचबरोबर प्रा.वैजनाथ महाजन, म.द.हातकणंगलेकर, वसंत केशव पाटील, कै.प्रा.डॉ.शंकर हादगल यांच्याशी झालेल्या चर्चेमुळे माझ्या कामाला गती मिळाली. त्यांचेही मी आभार मानतो.

क्रांतिवीर दत्ताजीराव पाटील माध्य.व उच्च माध्य. विद्यालय, प्रकाशनगर, सोनी च्या अध्यक्षा श्रीमती सावित्री चव्हाण, प्राचार्य प्रशांत चव्हाण, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य व शुभेच्छामुळेच हे काम करणे सोपे झाले. त्यांचाही मी ऋणी आहे.

माझ्यावर प्रेम करणारे श्री.आर.एम.चव्हाण तसेच माझा सर्व मित्र परिवार यांच्या सहकार्यामुळेच हे काम पूर्णत्वास जात आहे. त्यांचेही मी आभार मानतो.

ज्यांनी माझ्या शिक्षणासाठी कष्टाचा डोंगर उचलला ते माझे माता-पिता, आक्का आणि मामा. तुमच्या आशीर्वादामुळेच हे काम करणे सोपे झाले.

शि.म.डॉ.बापूजी सांळुखे महाविद्यालय, मिरज येथील ग्रंथपाल सहाय्यक श्री. वरूटे सर व विलिंग्डन महाविद्यालय, सांगलीचे ग्रंथपाल श्री. रास्ते सर तसेच पूर्वा झेरॉक्सचे श्री.उपळावीकर व श्री.जोशी यांनी हा प्रबंध वेळेत पूर्णकरून दिला, त्यचेही आभार मानतो.

माझ्या या प्रबंधाच्या कामी मदत करणाऱ्या ज्ञात-अज्ञात सर्वांचेच आभार मानतो व आपल्या सर्वांच्या ऋणात राहणे पसंत करतो.

**महादेव धोंडीराम चौगुले**

# प्रमाणपत्र

श्री.महादेव धोंडीराम चौगुले यांनी "चारुता सागर यांच्या कथासंग्रहामधील स्त्री जीवन : एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने हा लघु-शोध-प्रकल्प प्रबंधारूपाने स्वत:च पूर्ण केला आहे. हा लघु-शोध-प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल.पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे हे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते. त्याचा कोणताही भाग अन्य कोठेही अथवा कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

**प्राचार्य डॉ.हरिश्चंद्र निर्मळे**
**मार्गदर्शक**

स्थळ : सांगली

दिनांक : २९/६/२००७

# प्रतिज्ञापत्र

" चारुता सागर यांच्या कथासंग्रहामधील स्त्री जीवन : एक चिकित्सक अभ्यास " या विषयावरील लिहिलेला लघु-शोध-प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी सादर केलेला आहे. हा लघु-शोध-प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्य कोठेही अथवा कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

**श्री. महादेव धोंडीराम चौगुले**

स्थळ : सांगली

दिनांक : २९/०८/२००७

# प्रस्तावना

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला अत्यंत मानाचे स्थान दिले आहे. पुरूषाची अर्धांगीणी म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. भारतीय संस्कृतीची रक्षक म्हणूनही तिचे स्थान अनन्यसाधारण असेच आहे. ही देणगी स्त्री जीवनाला लाभलेली असतानाच अनादी काळापासून स्त्री जीवनाची होणारी फरफट आजच्या संगणकाच्या युगात थांबलेली नाही. आज जग एक खेडं बनलं आहे. प्रत्येक गोष्ट माणसाच्या मुठीत आलेली दिसते. दळणवळणाची मुबलक साधने उपलब्ध असून देखील ग्रामीण समाजातील स्त्री वर्गाला याचा फायदा होताना दिसत नाही.

ग्रामीण जीवन आजही लहरी पावसाच्या शेतीवर अवलंबून आहे. महापूर, दुष्काळ अशा नैसर्गिक समस्यांना ग्रामीण जीवनातील लोकांना तोंड देताना स्त्री वर्गाला अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागते. पुरूषाच्या बरोबरीने राबताना तिच्या शारीरिक क्षमतांचा देखील विचार केला जात नाही. यातून तिचा होणारा भावनिक कोंडमारा मन सुन्न करणारा आहे.

प्रसारमाध्यमामुळे समाजाचा झालेला विकास. यातून बड्या राष्ट्राच्या संस्कृतीचे होणारे अनुकरण व यामुळे वाढलेला चंगळवाद, भोगवाद, सुखाच्या अस्मि कल्पना यातून स्त्री शरीराची होणारी ओरबड, स्त्री जीवनात निर्माण होणारे प्रश्न न सुटणारे आहेत.

आज समाजामध्ये स्त्रीला मिळणारी वागणुक हीन दर्जाची आहे. तिच्याकडे एक भोगवस्तू म्हणून पाहिले जाते. स्त्री म्हणजे पुरूषाची दासी हे तिचे स्थान घट्ट होताना दिसते. हुंडा, अत्याचार, बलात्कार ही स्त्री जीवनाला लागलेली किड संपुष्टात आलेली नाही. आजही अनेक स्त्रिया आपले जीवन अर्ध्या वाटेत संपवताना दिसतात. पारंपरिक सासूच्या जाचातून तिची सुटका झालेली नाही. तो तिच्या जीवनाला शाप आहे हेच चित्र समाजात दिसून येते.

स्त्री जीवनाभोवती अनेक समस्यांनी थैमान घातल्याचेचं चित्र आहे. पुरूषाच्या व्यसन व लहरी स्वभावामुळे तिच्या वाट्याला येणारी वैधव्याची समस्या, पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी करावा लागणारा देहविक्रय, सामुहिक बलात्कार इ. समस्यामुळे तिच्या जीवनाची होणारी फरफट ह्दयाचा ठाव घेणारी आहे.

आजची स्त्री जरी स्वतंत्र असली ती स्वतःच्या पायावर उभी असली तरी चूल-मूल-नोकरी ही तिची तारेवरची कसरत सुरू आहे. तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तरी तिच्यापुढच्या

समस्या कमी झालेल्या नाहीत. उलट ती घराबाहेर पडल्याने तिच्या वाट्याला येणाऱ्या आनंदापेक्षा दु:खाचाच वाटा जास्त दिसतो. या धावपळीत तिच्या शरीराचे, मनाचे होणारे हाल, नोकरीतून निर्माण होणारे प्रश्न, मुलांचे प्रश्न, दररोजची धावपळ, सासू-सासरा-पती यांची करावी लागणारी मनधरणी, पुरुषी वखवलेल्या नजरा, यातून मार्ग काढत जगणे तिला महाकठीण होत आहे.

या पार्श्वभूमीवर चारुता सागरांच्या कथेमधील स्त्रीजीवन, त्यांच्या कथेतील नायिका, त्यांना करावा लागणारा संघर्ष, सासरच्या लोकांकडून तिचा होणारा छळ, भटक्या समाजातील स्त्रियांचे जग, त्यांची जातीव्यवस्था, स्त्रियांना पती पसंत नसण्याच्या समस्या, तिच्या वाट्याला येणारे विधवापण. यातून जीवन जगण्यासाठी तिने केलेले प्रयत्न याचा चारुता सागरांच्या 'नागीण', 'मामाचा वाडा', 'नदीपार' या कथासंग्रहाच्या आधारे प्रस्तुत लघुप्रबंधात शोध घेतला आहे.

* * *